आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२१ एप्रिल २०२४ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकाच्या तिसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्जांच्या छाननीत ३१७ उमेदवारांचे अर्ज वैध /उमेदवारी मागं घ्यायचा उद्या शेवटचा दिवस

- गेल्या दहा वर्षात सर्वसामान्यांसह महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीनं धोरणात्मक निर्णय घेणारा सक्षम पक्ष म्हणून भाजपानं कामगिरी केली असल्याचं भाजपा अध्यक्ष जेपी नड्डा यांचं प्रतिपादन

- देशाला आता स्मार्ट शहरांची नाही, तर स्मार्ट गावांची गरज असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं मत

- येत्या दोन दिवसात राज्यातल्या चारही विभागात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत कोलकाता इथं सुरु असलेल्या सामन्यात कोलकाता नाइटरायडर्सचं रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुपुढं विजयासाठी २२३ धावांचं लक्ष्य

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकांच्या तिसऱ्या टप्प्यासाठीच्या उमेदवारांच्या अर्जांची छाननी करायचं काम पूर्ण झालं असून त्यात ३१७ उमेदवारांचे अर्ज वैध असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. उद्या अर्ज मागे घ्यायची शेवटची तारीख आहे.

राज्यातल्या लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातलं मतदान ७ मे रोजी होणार आहे. यासाठी राज्यातल्या ११ मतदारसंघांमध्ये ३६१ उमेदवारांचे ५२२ अर्ज दाखल झाले होते.

रायगड लोकसभा मतदार संघात २१, बारामतीमध्ये ४६, उस्मानाबाद ३५, लातूर ३१, सोलापूर ३२, माढा ३८, सांगली २५, सातारा २१, रत्नागिरी-सिंधुदुर्ग ९, कोल्हापूरा २७, आणि हातकणंगले मतदारसंघात- ३२, असे एकूण ३१७ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत.

<><><><><><>

सर्वसामान्यांसह महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीनं धोरणात्मक निर्णय घेणारा सक्षम पक्ष म्हणून भाजपानं गेल्या दहा वर्षात कामगिरी केली आहे, असं प्रतिपादन भाजपा अध्यक्ष जेपी नड्डा यांनी केलं आहे. ते आज बुलढाणा जिल्ह्यात संग्रामपूर तालुक्यात वरवट बकाल इथं महायुतीचे उमेदवार प्रतापराव जाधव यांच्या प्रचारसभेत बोलत होते.

आज आपण ५ वी मोठी अर्थव्यवस्था बनलो आहोत आणि आता लवकरच जगातली तिसरी मोठी अर्थव्यवस्था व्हयचं असेल, २०४७ पर्यंत

विकसित भारत बनवायचा असेल तर भाजपा पुन्हा सत्तेत यायला हवी. असं ते म्हणाले.

**<><><><><><>**

देशाला आता स्मार्ट शहरांची नाही, तर स्मार्ट गावांची गरज असल्याचं मत केंद्रीय रस्ते विकास आणि परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केलं आहे. नांदेड जिल्ह्यात मुखेड इथं भाजपाचे उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रचारार्थ झालेल्या सभेत ते आज बोलत होते. शेती उत्पादनावर आता शेतकरी समृद्ध होणार नसून शेतकऱ्यांना आता अन्नदाता होण्यासोबतच ऊर्जादाता, इंधनदाता बनवण्याची गरज आहे, असं ते म्हणाले.

देशाचा इंधनावरचा खर्च कमी करण्यासाठी इथेनॉलचे पंप उघडायचं आवाहन त्यांनी केलं. यातून प्रदूषणापासून मुक्ती मिळण्यासोबतच देशाचा इंधनावरचा खर्चही कमी होणार आहे. शेतीसाठी अशा आधुनिक साधनांचा वापर करायचं आवाहन त्यांनी केलं.

या प्रचारसभेला भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, माजी मुख्यमंत्री, खासदार अशोक चव्हाण हे उपस्थित होते.

**<><><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रचारगीतातून हिंदू धर्म आणि जय भवानी हे शब्द वगळण्याची सूचना केंद्रीय निवडणूक आयोगानं

केली आहे. मात्र, प्रचारगीतातून हे शब्द वगळणार नाही, यासाठीचा न्यायालयीन लढा आम्ही लढू असं अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी आज मातोश्री निवासस्थानी आयोजित वार्ताहर परिषदेत सांगितलं.

'जय भवानी' हा उल्लेख एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या प्रचार गीतामध्येही आला होता, तो देखील वगळण्याची सूचना निवडणूक आयोगाच्या समितीनं केली होती. ती आणि इतर धार्मिक उल्लेख वगळून पुन्हा नवीन गीत सादर झाल्यावर त्याला मंजुरी दिल्याचं सूत्रांनी सांगितलं.

अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनं तसंच राज ठाकरे यांच्या मनसेनं सादर केलेल्या काही जाहिरातींमध्येही विविध प्रकारचे धार्मिक चिन्ह, उल्लेख, फोटो होते. ते देखील वगळण्याची सूचना निवडणूक आयोगाच्या समितीनं केली आहे.

**<><><><><><>**

भारतात सत्ताबदलाचा अंदाज आल्यानेच जगातले आघाडीचे उद्योगपती आणि टेस्ला उद्योगाचे प्रमुख एलन मस्क यांनी आपला भारत दौरा लांबणीवर टाकला असल्याचं काँग्रेसचे प्रवक्ते अनंत गाडगीळ यांनी म्हटलं आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर असे निर्णय घेताना आर्थिक, राजकीय परिस्थितीचा बारकाईने अभ्यास केला जातो, त्यामुळे आता भारतात सत्ताबदल होणार असल्याचा अंदाज जगात सर्वांनाच आला असल्याचं मस्क यांच्या निर्णयारुन दिसतं, असं गाडगीळ यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण रायगड लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

. **<><><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत कोलकाता इथ इडन गार्डन्स मैदानावर सुरु असलेल्या सामन्यात कोलकाता नाइटरायडर्सनं रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुपुढं विजयासाठी २२३ धावांचं लक्ष्य ठेवलं आहे.

बंगळुरुनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. कोलकाता नाइटरायडर्सनं निर्धारित २० षटकात ६ गडी गमावून २२२ धावा केल्या. कर्णधार श्रेयस अय्यरचं अर्धशतक, आणि फिलिप साल्टच्या १४ चेंडूत ४८ धावांच्या तडाखेबंद खेळीमुळे संघाला चांगली धावसंख्या उभारता आली. विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुची  खराब सुरुवात झाली. सलामीच्या जोडीतला विराट कोहली १८ धावा करुन बाद झाला. त्यानंतर चौथ्या षटकात कर्णधार फॅफ डू प्लेसिस

७ धावा करुन बाद झाला. मात्र त्यानंतर विल जॅक्स आणि रजत पाटीदार यांनी डाव सावरला. जॅक्सनं ५५ तर पाटीदारनं ५२ धावा केल्या.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा बंगळुरुच्या १५ षटकात ६ बाद १७४ धावा झाल्या होत्या.

या स्पर्धेतला आजचा दुसरा सामना पंजाब किंग्ज आणि गुजरात टायटन्स यांच्यात होणार आहे. मोहालीमधे थोड्याच वेळात, म्हणजे साडेसात वाजता सुरु होणार आहे. पंजाब किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटाची शक्यता आहे. मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी गारा पडण्याचा इशारा वेधशाळेनं दिला आहे. विदर्भात सोसाट्याचा वारा वाहण्याचा अंदाजही वर्तवण्यात आला आहे. कोकणात हवामान उष्ण आणि दमट राहण्याची शक्यता आहे.

राज्यात सर्वाधिक तापमान वाशीम इथं ४३ पूर्णांक २ अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

**<><><><><><>**

भगवान महावीर जयंतीनिमित्त आज देशभरात विविध कार्यक्रम होत आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना महावीर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीच्या भारत मंडपम मध्ये २ हजार ५५० व्या भगवान महावीर निर्वाण महोत्सवाचं उद्घघाटन झालं. यावेळी प्रधानमंत्र्यांनी एक विशेष टपाल तिकिट आणि नाण्याचं प्रकाशन केलं. आपल्या भाषणात मोदी म्हणाले की, भारत ही सर्वात प्राचीन संस्कृतीच नाही, तर मानवतेचा सर्वात सुरक्षित स्वर्ग आहे.

भगवान महावीर जयंतीनिमित्त मुंबईतल्या ठिकठिकाणच्या जैन मंदिरांमध्ये आज विविध अध्यात्मिक कार्यक्रम सुरु आहेत.

**नवी मुंबईत** महावीर जयंती निमित्त जैन बांधवांनी आज वाशी इथल्या जैन मंदिरात भगवान महावीरांच्या शिकवणीचं स्मरण केलं. वाशी शहरात भव्य शोभा-यात्राही काढण्यात आली. या यात्रेत महिला मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या होत्या.

**पालघर** जिल्ह्यातल्या बोईसर तसंच पालघर शहरात भव्य शोभा यात्रा काढण्यात आल्या. जिल्ह्यातल्या इतर भागातही महावीर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

**<><><><><><>**

NTA अर्थात, राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नेट अर्थात, राष्ट्रीय पात्रता चाचणी, २०२४ साठीची नोंदणी प्रक्रिया सुरू केली आहे. इच्छुक उमेदवार अधिकृत वेबसाइटवर उपलब्ध असलेल्या लिंकद्वारे राष्ट्रीय पात्रता परीक्षेसाठी अर्ज करू शकतात. १० मे पर्यंत नोंदणी प्रक्रिया सुरू राहणार आहे.

<><><><><>

आज नागरी सेवा दिन आहे. यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी सर्व सनदी अधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

देशाच्या प्रत्यक्ष कर संकलनात आर्थिक वर्ष २०२३- २४ मध्ये १७ पूर्णांक ७ दशांश टक्के वाढ होऊन निव्वळ संकलन १९ लाख ५८ हजार कोटी रुपये झालं आहे. गेल्या आर्थिक वर्षात प्रत्यक्ष कर संकलन १६ लाख ६४ हजार कोटी रुपये झालं होतं. केंद्रीय अर्थ मंत्रालयानं आज ही माहिती दिली.

//<><><><><>//